MHGA030007022024

दाखल तारीख : ०२.०७.२०२४
नोंदणी तारीख : ०२.०७.२०२४
निकाल तारीख : १०.०४.२०२६
०१ ०९ ०८
कालावधी वर्ष म. दि.

**<u>अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी गडचिरोली यांच्या न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी श्री. एस बी विजयकर)

**<u>कि.फौ.प्र.क्र.१६८/२०२४</u>** **निशाणी क्र.१८**

१) किरण तुकाराम गेडाम
वय : २५ वर्ष, धंदा : गृहिणी
२) तन्मय तुकाराम गेडाम,
वय ०४ वर्ष धंदा : काही नाही
अर्जदार क्र. २ तर्फे अ.पा.क. आई अर्जदार क्र. १,
दोन्ही रा. मरेगांव पो. मौशीखांब,
तह. जि. गडचिरोली. **.......अर्जदार**

**<u>विरूध्द</u>**

तुकाराम सिताराम गेडाम,
वय २८ वर्ष, धंदा : मजुरी,
रा. शंकरपुर हेटी, ता. चामोर्शी,
जि. गडचिरोली. **......गैरअर्जदार**

---

अर्जदारतर्फे कु. के. जी. पत्तीवार वकील मॅडम.
गैरअर्जदारतर्फे श्री. एस. आर. ठाकरे वकील साहेब

---

**<u>न्यायनिर्णय</u>**

(निकाल तारीख १०.०४.२०२६)

अर्जदार हिने भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम १४४ प्रमाणे पोटगी

मिळण्याकरीता प्रकरण दाखल केले आहे.

२. प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की,

अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार हे पती पत्नी असून त्यांचे लग्न दिनांक २४.०४.२०१९ रोजी मौजा शंकरपुर हेटी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली येथे गैरअर्जदाराच्या वडिलांच्या घरी त्यांच्या धर्मानुसार झालेला आहे. या लग्न संबंधातून त्यांना अर्जदार क्र. २ तन्मय नावाचा मुलगा आहे.

३. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदाराच्या घरी नांदण्यास गेली. तिला गैरअर्जदाराने एक दिड महिना चांगले वागविले. त्यानंतर गैरअर्जदार दारू पिऊन अर्जदार क्र. १ ला विना कारण झगडा भांडण करून मारहाण करू लागला. गैरअर्जदार अर्जदार क्र. १ हिला नेहमी म्हणत होता की, ''मला तुझ्या पासून घटस्फोट पाहीजे''. अर्जदार क्र. १ गैरअर्जदार सोबत या आशेने जिवन जगत होती की, तो आज न उद्या सुधारेल. परंतु, त्याच्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. अश्यातच ती गरोदर राहिली. एप्रिल, २०२० मध्ये ती ६ महिन्याची गर्भवती असतांना गैरअर्जदारने अर्जदार क्र. १ सोबत भांडण केले, ''तु माझ्या घरी राहू नको'', ''माझ्या घरातून निघून जा'', मला घटस्फोट दे असे म्हणून घराबाहेर काढले व मारहाण केली. मारहाणीमुळे तिचा गर्भ सरकला, तिला अत्यंत वेधना होऊ लागल्या म्हणून गैरअर्जदारने भितीपोटी अर्जदाराला चामोर्शी येथिल सरकारी दवाखान्यात नेले. नंतर तिला जिल्हा सामान्य रूग्णालय गडचिरोली येथे भरती केले. ती त्या ठिकाणी चार दिवस भरती होती. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या आई वडीलांना फोन करून बोलाविले व त्यानंतर तो तेथून पळून गेला.

४. अर्जदाराची दवाखान्यातून सुट्टी झाल्यानंतर ती माहेरी आली. त्यानंतर अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदारला वारंवार फोन केले परंतु, त्याने फोन उचलला नाही. दिनांक २४.०८.२०२० रोजी अर्जदाराने मुलाला जन्म दिला परंतु, गैरअर्जदार किंवा त्याचे आई वडील मुलाला बघण्यास आले नाही किंवा कोणत्याही कार्यक्रमात आले नाही.

५. गैरअर्जदाराने जानेवारी २०२१ मध्ये महिला तक्रार निवारण संमितीकडे खोटी तक्रार दाखल केली व त्या ठिकाणी दोघांनाही बोलाविण्यात आले होते, गैरअर्जदार त्या ठिकाणी हजर झाला नाही व तोडगा निघाला नाही. अर्जदार हिने दिनांक १८.०६.२०२४ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गडचिरोली येथे गेली असता त्या प्राधिकरणासमोर गैरअर्जदाराने म्हटले की, त्याला घटस्फोट पाहिजे. त्या ठिकाणी तडजोड

झाली नाही. गैरअर्जदाराने अर्जदारांना नांदविण्यासाठी घेवून गेला नाही. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार सोबत नांदावयास तयार आहे परंतु, गैरअर्जदार नांदविण्यास तयार नाही व कोणतीही काळजी घेण्यास तयार नाही.

६. अर्जदार यांना त्यांच्या पालन पोषणाकरिता अंदाजे दरमहा १७,०००/— रूपये खर्च येतो. गैरअर्जदार ठेकेदारीचे काम करतो. त्याला महिन्याअंती ३०,०००/— रूपये मिळते. तसेच त्याच्या जवळ ४ एकर शेती असून तो त्यात दुहेरी पिक घेतो त्यामुळे त्याला दर वर्षी ६,०००,००/— रूपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार अर्जदारांना पोटगी देण्यास सक्षम आहे. उलटपक्षी अर्जदार हे हलाखीचे जिवन जगत असून त्यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही म्हणून अर्जदार यांना सदरचा अर्ज मंजूर करून दरमहा १७,०००/— रूपये पोटगी देण्याचे आदेश करावे अशी विनंती केली आहे.

७. गैरअर्जदाराला संमन्स काढण्यात आले. गैरअर्जदाराला संमन्स प्राप्त झाले. तो त्याच्या विधिज्ञमार्फत नि.क्र. १० प्रमाणे हजर झाला. परंतु त्याने कोणतेही उत्तर/कोणतेही जबाब दाखल केले नाही म्हणून माझे पूर्व अधिकारी यांनी दिनांक ०९.०१.२०२५ रोजी नि.क्र. १ वर आदेश पारित करून प्रकरण गैरअर्जदार यांच्या विरूध्द विना जबाब चालविण्याचे आदेश पारित केले.

८. अर्जदार क्र. १ ने नि.क्र. १३ वर स्वत:चा पुरावा दाखल केला व नि.क्र. १७ वर पुरसिस दाखल करून पुरावा बंद केला. गैरअर्जदारने कोणताही पुरावा दाखल केला नाही म्हणून मी दिनांक २४.०२.२०२६ रोजी आदेश पारित करून गैरअर्जदाराचा पुरावा बंद केला. अर्जदार यांच्या विधीज्ञांना ऐकले. गैरअर्जदार यांचे विधिज्ञांनी कोणताही युक्तीवाद केला नाही म्हणून हे प्रकरण न्यायनिर्णयास ठेवण्यात आले.

९. खालील मुददे माइ—या निदर्शनास आले व त्यावर मी खालील प्रमाणे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **<u>मुददा</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १ | अर्जदारांचा गैरअर्जदार याने उत्पन्नाचे साधन असतांना सुध्दा देखभाल करण्यास दुर्लक्ष केले असे अर्जदारांनी सिध्द केले काय? | होकारार्थी |
| २ | अर्जदार यांच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही असे | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | अर्जदारांनी सिध्द केले काय? | |
| ३ | गैरअर्जदार यांच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे असे अर्जदारांनी सिध्द केले काय ? | होकारार्थी |
| ४ | अर्जदार पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| ५ | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

**<u>कारणमिंमांसा</u>**

**<u>मुददा क्रं.१ ते ५ करीताः—</u>**

१०. गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला नाही, अर्जदार क्र. १ चा पुरावा खोडून काढण्यात आलेला नाही. साक्षदार क्र. १ चा पुरावा उलटतपासा दरम्यान खंडित झालेला नाही किंवा गैरअर्जदाराने तिचा उलटतपास घेतला नाही त्यामुळे साक्षदार क्र. १ खोटी बोलते किंवा खोटा पुरावा देत आहे असे अभिलेखावर आलेले नाही.

११. मी अर्जदार यांच्या युक्तीवादाचे विवेंचन केले व त्याचा विचार केला. अर्जदार क्र. १ चा पुरावा हे दर्शविते की, एप्रिल २०२० पासुन अर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार क्र. १ च्या माहेरी राहत आहे. त्या दरम्यान गैरअर्जदाराने अर्जदारांच्या देखभाली करिता कोणतीही काळजी घेतलेली नाही. अर्जदार क्र. २ हा आता ६ वर्षाचा आहे. अर्जदार क्र. २ चा जन्मानंतर ते आतापर्यंत गैरअर्जदाराने कोणतीही काळजी घेतली नाही व दोघांच्या पालन पोषणाकडे दुर्लक्ष केले आहे. तसेच असेही दिसून येते की, जरी गैरअर्जदाराला संमन्स प्राप्त झाले, तो हजर झाला तरीही या प्रकरणात त्याने लेखी जबाब दाखल केला नाही, साक्षदार क्र. १ चा उलटतपास घेण्याचा प्रयत्न केला नाही. या सर्व बाबींवरून हे सिध्द होते की, गैरअर्जदार विनाकारण अर्जदार यांची देखभाल करित नाही व दुर्लक्ष करित आहे.

१२. अर्जदार क्र. १ ही महिला आहे तर अर्जदार क्र. २ हा ४ ते ६ वर्षाचा मुलगा आहे. तो अगदी लहान आहे तसेच तो त्याच्या आई वडीलांवर अवलंबून आहे त्यामुळे अर्जदार यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. या प्रकरणात अर्जदार यांनी गैरअर्जदारकडे असलेल्या उत्पन्नाचे दाखले किंवा दस्तऐवज दाखल केलेले नाही.

अर्जदार यांच्या प्रमाणे गैरअर्जदार हा २८ ते ३० वर्षाचा आहे. गैरअर्जदाराने प्रकरणात हजर राहून लेखी जबाब दाखल केले नाही. तो कोणतेही काम करित नाही, त्याला शारिरिक व्यंग व तो कमावू शकता नाही अश्या प्रकारचा विरोधाभासी पुरावा अभिलेखावर गैरअर्जदाराने आणलेला नाही. याचा अर्थ असा की गैरअर्जदार हा धड धाकट व्यक्ती आहे त्याला कोणतेही शारिरिक व्यंग नाही. जर त्यांने अंग मेहनत करून मजुरीचे काम करून मजुरी मिळविल्यास त्याला आताची परिस्थिती बघता ५००/— ते १०००/— रूपये दररोज मजूरी मिळू शकते. महिन्याकाठी तो २५,०००/— ते ३०,०००/— रूपये कमावू शकतो. याचा अर्थ असा की, त्यांच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे. जर त्याच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे तर तो हमखासपणे अर्जदार यांना पोटगी देवू शकतो.

१३. गैरअर्जदार याच्याकडे असलेल्या उत्पन्नाचे साधनमुळे तो अर्जदार यांना १०,०००/— रूपये प्रतिमहा देवू शकतो म्हणून अर्जदार पोटगी मिळण्यास पात्र आहे.

१४. वरील सर्व कारण मिमांसावरून मी मुद्दा क्र. १ ते ४ यांना होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो व सदरचा अर्ज अंशःत मंजूर करण्यास पात्र आहे म्हणून पुढील आदेश पारित करतो.

**आदेश.**

१. अर्ज अंशःत मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार याने अर्जदार यांना अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा रूपये १०,०००/— खावटी दयावी.

३. गैरअर्जदाराने या प्रकरणाचा खर्च म्हणून रुपये ५०००/— अर्जदार यांना दयावे.

४. आदेशाची प्रत विनामुल्य दोन्ही पक्षांना देण्यात यावी.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by SANTOSH BHOLARAM VIJAYKAR
Date: 2026.04.10 16:20:23 +0530

गडचिरोली
दिनांक १०.०४.२०२६

(एस. बी. विजयकर)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी
गडचिरोली